# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०५/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## ऑनलाईन फसवणूकीत पैसे थांबविण्यात नागपूर ग्रामीण सायबर पोलीस स्टेशनचे यश

माहे एप्रिल मध्ये नागपूर ग्रामीण घटकामधील पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत तक्रारदार १) प्रणय घोरले यांचे ऑफलाईन फसवणूकीतील होल्ड झालेली रक्कम ६,१७,२१५/—रू. २) पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत तक्रारदार नितीन चिमुरकर यांचे ऑफलाईन फसवणूकीतील ६९१०५/—रू. ३) पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत तक्रारदार सुनिल मस्के यांचे ऑफलाईन फसवणूकीतील ३५०००/—रू. ४) पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत तक्रारदार प्रणय आगे यांचे ऑफलाईन फसवणूकीतील ३००००/—रू. ५) पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत तक्रारदार भाविका दुबे यांचे ऑफलाईन फसवणूकीतील ७२,०००/—रू. ६) पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत तक्रारदार प्रकाश पौनिकर यांचे ऑफलाईन फसवणूक ५५,४१८/—रू. यांनी NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार केली.

सदर तक्रार सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे प्राप्त होताच तपासाचे सुत्र हालवुन सदर तक्रारदारचे पैसे कोणकोणत्या खात्यावर ट्रान्सपर झाले याची माहिती तात्काळ घेण्यात आली. व सायबर फ्रॉड मधील आरोपी पैसे लवकर विड्रॉल करतात याची माहिती असल्यामुळे ज्या खात्यावर पैसे ट्रान्सपर झाले आहे ते सर्व अकांउट डेबिट फ्रिज केले. त्यामुळे तक्रारदारचे पैसे ज्या बॅक खात्यामध्ये गेले ते पैसे होल्ड झाले. त्यांनतर तक्रारदारांना बोलवुन कोर्टा मध्ये सदर रक्कम परत घेण्याबाबत योग्य मार्गदर्शन करून मा. कोर्ट नागपूर येथे पेसै परत घेणे करीता सुपूर्दनामा दाखल केला. मा. कोर्टाने कार्यवाही पूर्ण करून तक्रारदारचे फसवणुक झालेली रक्कम परत करण्याचे आदेश पारित केले. यांमुळे तक्रारदारने सायबर पोलीस स्टेशन व मा. न्यायलयाचे आभार मानले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस चंद्रशेखर चकाटो, पो.उपनि. भारत थिटे, पो.हवा स्नेहलाता ढवळे, वर्षा खंडाईत, मनापोअं संगीता गावंडे, ममता सरोदे, नापोअं सतीष राठोड, पोशि मृणाल राऊत, मनीष नेवारे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर